333

महसूल व वन विभाग

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, जळगाव

**(गृह शाखा)**

आकाशवाणी केंद्राजवळ, जळगांव, ता.जि.जळगाव - 425 001

**दुरध्वनी क्रमांक** - 0257- 2220152 **ई मेल** - homebranchjalgaon@gmail.com

क्रमांक दंडप्र-04/ E Comp. No.: 1630793 File No.: COLJG-20014(23)/32/2025-HOME दिनांक- 26/06/2025

**प्रति,**

मा. प्रबंधक,
राष्ट्रीय हरित लवाद,
पश्चिम विभाग खंडपीठ, पुणे.

**विषय:** मुळ अर्ज क्र. 23/2025 मधील अंतरिम अर्ज क्र. 65/2025 (प.वि. पुणे) यामध्ये निर्देशीत केल्यानुसार अहवाल सादर करण्याबाबत..

महोदय,

मा. राष्ट्रीय हरित लवाद, (पश्चिम विभाग) खंडपीठ, पुणे यांच्यासमोर प्रलंबित असलेल्या मुळ अर्ज क्र. 23/2025 मधील अंतरिम अर्ज क्र. 65/2025 (प.वि. पुणे) संदर्भात, हरित लवादने दिनांक ०६/०३/२०२५ रोजी दिलेल्या आदेशातील कलम ६ अन्वये समिती गठीत करून चौकशी अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते.

त्याअनुषंगाने या कार्यालयामार्फत दिनांक 02/04/2025 रोजी समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीत जिल्हाधिकारी यांचे वतीने उपविभागीय अधिकारी जळगाव यांची समन्वय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यानुसार समन्वंय अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी, जळगाव, व समितीतील सदस्य महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उपप्रादेशिक अधिकारी, कार्यकारी अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव यांनी **"मौजे गारखेडा पर्यटन विकास प्रकल्प, वाघूर धरण बेट"** या स्थळी दिनांक 13/05/2025 व दिनांक 20/05/2025 रोजी जावून प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण करून या कार्यालयास दिनांक 02/6/2025 रोजी अहवाल सादर केलेला आहे. सदर समितीने या कार्यालयास सादर केलेल्या अहवालाची प्रत यालगत सादर करण्यात आलेली आहे. तथापी सदर अहवालाच्या अनुषंगाने खालील मुद्दे अधोरेखीत करण्यात येत आहेत.

1. **"मौजे गारखेडा पर्यटन विकास प्रकल्प, वाघूर धरण बेट"** हे पर्यावरणीय दृष्ट्या संवेदनशील क्षेत्रात मोडत नाही. केंद्र शासनाकडून यासंबंधी कोणतीही अधिसूचना निर्गमित करण्यात आलेली नाही.

334

2. सदर ठिकाणी 9 झोपड्या, 3 व्हिला, 3 जलतरण टाक्या, 12 कॉटेज, 12 सूट्स, 3 हाऊसबोट्स आढळल्या आहेत. काही बांधकाम अपूर्ण स्थितीत आहेत. एकूण बांधकाम क्षेत्र अंदाजे 13,000 चौ.मी. असून हे 20,000 चौ.मी. पेक्षा कमी असल्यामुळे पर्यावरणीय मंजुरी (EIA Notification) लागू होत नाही. कार्यकारी अभियंता, वाघूर धरण विभाग, यांनी केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाकडून दिनांक 27.10.2006 रोजी धरण प्रकल्पासाठी पर्यावरणीय मंजुरी प्राप्त केलेली आहे.
3. समितीने सादर केलेल्या अहवालानुसार ग्रामपंचायत गारखेडा बु. यांचे दिनांक 12/08/2022 रोजीच्या ठरावाच्या अनुषंगाने वनविभागाची परवानगीसह क्षेत्र- 0.45 हेक्टर वनजमिनीवर 1200 मी लांबीचा व 3.75 मी रुंदीचा रस्ता बांधण्यास उपवनसंरक्षक, जळगाव यांनी अटींसह परवानगी दिलेली आहे.
4. सदर ठिकाणी 10 KLD क्षमतेचे 3 सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा कार्यरत असून कोणतेही जल प्रदूषण निदर्शनास आले नाही. प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून परवानगी प्राप्त आहे.
5. सदर ठिकाणी बोटिंगसाठी जलसंपदा विभागाची परवानगी, पर्यटन विकासासाठी वाघूर सिंचन विभागाची मान्यता, भूजल उपशासाठी केंद्रीय भूजल प्राधिकरणाची मंजुरी घेण्यात आलेली आहे.

तरी सदर ठिकाणी पाहणी दरम्यान कोणतेही स्पष्ट पर्यावरणीय उल्लंघन निदर्शनास आले नाही. आवश्यक परवानग्या प्राप्त असून काही कामे आज रोजी प्रगतीपथावर चालु आहेत.

तथापि, सदर नियुक्त समितीचा अहवाल प्रलंबित असताना, अर्जदार श्री. ललितकुमार एन. चौधरी यांनी दिनांक 19/05/2025 व दिनांक 22/05/2025 रोजी माझ्या कार्यालयात अर्ज देऊन चौकशीच्या अनुषंगाने त्यांनी त्यांच्या अर्जातील मुद्दे विचारात घेण्याबाबत विनंती केलेली होती. त्या अनुषंगाने चौकशी करण्यात आलेली असून त्याबाबत देखील अहवाल मागविण्यात आलेला आहे. त्याबाबत थोडक्यात तपशिल पुढील प्रमाणे आहे.

मौजे गारखेडा, तालुका जामनेर, जिल्हा जळगाव येथील **"मौजे गारखेडा पर्यटन विकास प्रकल्प, वाघूर धरण बेट"** या प्रकल्पाच्या ठिकाणी घनकचरा व्यवस्थापनाच्या अनुषंगाने उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यांना घनकचरा व्यवस्थापन करण्याबाबत ग्रामपंचायतीतर्फे काय उपाययोजना व व्यवस्थापन करण्यात आले आहे. त्याबाबत प्रत्यक्ष स्थळनिरिक्षण करुन अहवाल मागविण्यात आलेला असून सदर अहवालानुसार सदर ठिकाणी सांडपाण्याच्या व्यवस्थेसाठी तीन STP युनिट्स कार्यरत आहेत. तसेच घनकचरा व्यवस्थापनासाठी प्रकल्पात 2 कम्पोस्ट पीट (प्रत्येकी 4'x4'x5') = 80 **घन फूट क्षमतेचे उपलब्ध आहेत.** तसेच सदर ठिकाणावरील घन कचऱ्याचे ग्रामपंचायत मार्फत बेटावरील कचऱ्याचे वेळोवेळी वहन व सुरक्षित विल्हेवाट करण्यात येते. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रामपंचायत जिल्हा परिषद जळगाव यांचेकडील अहवालाचे अनुषंगाने गारखेडा पर्यटन प्रकल्पात सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापनाची सोय उपलब्ध असून ती नियमित कार्यरत असल्याचे व सदर सांडपाणी व घनकचरा ग्रामपंचायतीमार्फत आवश्यक ती यंत्रणा वापरून व्यवस्थीत उपसा व विल्हेवाट करण्यात येत आहे.

तसेच कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे मार्फत "मौजे गारखेडा पर्यटन विकास प्रकल्प, वाघूर धरण बेट" या प्रकल्पाच्या ठिकाणी प्रकल्पासंदर्भात अर्जदाराने केलेल्या आरोपानुसार सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत धरणाच्या पाण्यातुन कुठलाही रस्ता तयार करण्यात आलेला नसल्याचा अहवाल सादर केलेला आहे. (त्याबाबतच्या अहवालाची प्रत सोबत सादर)

तसेच मौजे गारखेडा पर्यटन विकास प्रकल्प, वाघूर धरण बेटावरील सांडपाणी प्रक्रिया करुन धरणात सोडण्यात येते त्या ठिकाणावरील पाण्याचे नमुने तपासणी कामी प्रादेशिक अधिकारी प्रदुषण नियंत्रण मंडळ जळगांव यांचेमार्फत घेण्यात आलेले आहेत.

**"मौजे गारखेडा पर्यटन विकास प्रकल्प, वाघूर धरण बेट"** या ठिकाणी पर्यटन विभागामार्फत सुरु करण्यात आलेल्या कामामुळे पर्यावरणाचा कोणताही ऱ्हास होत नसल्याचे दिसून येते. सदरच्या कामास विविध विभागाच्या परवानग्या घेण्यात आलेल्या असून त्या काही अटी व शर्तीवर देण्यात आलेल्या आहेत.

अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जाचे अवलोकन केले असता प्रस्तुत तक्रार मोघम स्वरुपाची असून त्यासोबत पुरावा म्हणून पर्यावरणीय हानीबाबत तांत्रीक स्वरुपाचा पुरावा अथवा अहवाल दाखल केलेला नसल्याचे दिसून येते. तसेच अर्जदार यांनी पर्यावरणीय हानी अथवा उल्लंघन झाल्याबाबतचे पुरावे सादर केलेले दिसुन येत नाही. त्यामुळे मा. हरित प्राधिकरणास राष्ट्रीय हरीत प्राधिकरण कायदा 2010 चे कलम 19 तसेच राष्ट्रीय हरीत प्राधिकरण (Practice and Procedure rules) 2011 अन्वये सदर अर्ज खारीज होण्यास पात्र आहे.

अर्जदाराच्या अर्जामध्ये जर तथ्य नसेल तर अर्ज रद्द होण्यास पात्र असतो या स्वारुपाचा निर्णय मा.राष्ट्रीय हरीत प्राधिकरण नवी दिल्ली या प्राधिकरणाने मुळ अर्ज क्रमांक 466/2023 प्रेमपाल विरुध्द उत्तरप्रदेश शासन यामध्ये दिनांक 06/03/2024 मध्ये आदेश पारीत केलेला असून प्रस्तुत अर्जामधील मुद्दे व मा. राष्ट्रीय हरीत प्राधिकरण नवी दिल्ली यांनी वर नमुद प्रमाणे पारीत केलेला आदेश यामध्ये साम्यता असल्याने प्रस्तुत आदेश सदर अर्जाच्या अनुषंगाने लागु होतो.

मा. हरीत प्राधिकरणाने दिनांक 02/04/2025 रोजी आदेशानुसार नियुक्त केलेल्या समितीचा दिनांक 02/06/2025 रोजीचा अहवाल तसेच उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जळगाव यांचा घनकचरा व्यवस्थापनाबाबतचा अहवाल व कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग जळगाव यांचा दिनांक 23/06/2025 रोजीचा अहवाल व प्रत्यक्ष स्थळनिरीक्षण या वरुन अर्जदाराच्या अर्जातील पर्यावरणाची हानी झाल्याबाबतच्या मुद्यात तथ्य नसल्याने अर्ज निकाली काढणेस विनंती आहे.

जिल्हाधिकारी जळगाव

(आयुष प्रसाद)
**जिल्हाधिकारी जळगाव**

सोबत गठीत केलेल्या समितीच्या अहवालाची प्रत व इतर संलग्न कागदपत्र सादर केले आहेत.

सोबत पानांक १ ते २५

महसूल व वन विभाग

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, जळगाव

**(गृह शाखा)**

आकाशवाणी केंद्राजवळ, जळगांव, ता.जि.जळगाव - 425 001

**दुरध्वनी क्रमांक** - 0257- 2220152 **ई मेल** - homebranchjalgaon@gmail.com

क्रमांक दंडप्र-04/ E Comp. No.: 1630793 File No.: COLJG-20014(23)/32/2025-HOME दिनांक डिजीटल स्वाक्षरीप्रमाणे

**तातडीचे /महत्वाचे**

**मा. राष्ट्रीय हरीद लवाद संदर्भ**

**राष्ट्रीय हरित लवाद समिती गठीत करण्याबाबत**

आदेश.

मा. राष्ट्रीय हरित लवाद खंडपिठ पुणे यांचेकडे अर्ज क्र. 65/2025 अन्वये श्री. ललितकुमार एन. चौधरी यांनी तक्रार दाखल केलेली असून सदर तक्रारीच्या अनुषंगाने मा. राष्ट्रीय हरीत लवाद खंडपिठ पुणे यांनी दिनांक 06 मार्च 2025 रोजी आदेश पारित केला असून सदर आदेशानुसार जिल्हाधिकारी जळगाव यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करून आदेशात नमुद केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने चौकशी करुन त्याबाबतचा सविस्तर अहवाल सादर करणेबाबत निर्देशीत केलेले आहे.

तरी मा. राष्ट्रीय हरित लवाद खंडपिठ पुणे यांचे निर्देशानुसार खालील प्रमाणे नमुद केलेनुसार समिती गठीत करण्यात येत आहे.

**समितीची रचना:**

1. **जिल्हाधिकारी जळगाव यांचे वतीने उपविभागीय अधिकारी जळगाव भाग जळगाव (समन्वय अधिकारी)**
2. **मुख्य वनसंरक्षक, नागपूर**
3. **उपसंचालक, पर्यटन विकास महामंडळ, नाशिक**
4. **कार्यकारी अभियंता, तापी सिंचन विकास महामंडळ, जळगाव**
5. **उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, जळगाव**

समन्वय अधिकारी यांनी वेळोवेळी उक्त नमुद समितीसोबत संपर्क साधुन विहीत मुदतीत अहवाल सादर करण्याची कार्यवाही करावी. अहवाल सादर करतांना मा. राष्ट्रीय हरित लवाद न्यायालयाने विषयांकित आदेशातील नमुद सर्व निर्देशांची काटेकोरपणे अमलबजावणी होईल यांची विशेष नोंद घ्यावी.

सदर आदेशानुसार नुसार नियुक्त समितीने मा. राष्ट्रीय हरित लवाद खंडपिठ पुणे यांचेकडील दिनांक 06 माचे 2025 रोजीच्या आदेशामध्ये नमुद केलेल्या मुद्यांनुसार चौकशी करून चौकशी अहवाल या आदेशाचे दिनांकापासून 21 दिवसांच्या आत या कार्यालयास सादर करावा. मा. राष्ट्रीय हरीत लवाद संदर्भ असल्याने कालमर्यादेत विविक्षीत कार्यवाही पुर्ण होईल याची विशेष दक्षता घ्यावी.

सोबत मा. राष्ट्रीय हरित लवाद खंडपिठ पुणे यांचेकडील दिनांक 06 माचे 2025 रोजीच्या आदेशाची प्रत जोडली आहे.

Signed by
Ayush Prasad
Date: 02-04-2025 19:40:45

**(आयुष प्रसाद)**
**जिल्हाधिकारी जळगाव**

प्रत : सर्व संबंधित यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित

(३)

३३७

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

# उपविभागीय अधिकारी जळगाव भाग, जळगाव यांचे कार्यालय, जळगाव

पत्ता:- जिल्हाधिकारी जळगाव कार्यालय आवार, आकाशवाणी चौक, जळगाव पिन ४२५००१

दुरध्वनी क्र.०२५७-२२२०८६८ ई-मेल:- jalgaonsdo@gmail.com

क्र./दंडप्र/कावि/४३९/२०२५ दिनांक- ०२ /०६/२०२५

**प्रति,**

**मा.जिल्हाधिकारी जळगाव**

**(गृह शाखा)**

विषय:-मा.राष्ट्रीय हरित लवाद खंडपिठ, पुणे यांचेकडे समीतीचा अहवाल सादर करण्याबाबत.

संदर्भ : १.मा.राष्ट्रीय हरित लवाद खंडपिठ, पुणे यांचा आदेश,दिनांक ०६/०३/२०२५

२ आपलेकडील पत्र क्र. दंडप्र-०४/EComp.No.: १६३०७९३ File No.: COLJG-२००१४(२३)/३२/२०२५-HOME, दिनांक ०२/०४/२०२५

**मा.महोदय,**

वरील संदर्भाकीत विषयानुसार आपणास आदरपुर्वक सादर करण्यात येते की, संदर्भाकींत आदेशानुसार आपण गठीत केलेल्या राष्ट्रीय हरित लवाद समीतीचा अहवाल या पत्रासोबत आदरपुर्वक सादर करण्यात येत आहे.

**सहपत्र- राष्ट्रीय हरित लवाद समीतीचा अहवाल**

आदरपूर्वक,

(विनय गोसावी)

उपविभागीय अधिकारी

जळगाव भाग जळगाव

**BEFORE THE NATIONAL GREEN TRIBUNAL, WESTERN ZONE BENCH, PUNE**

**OA NO. 23/2025 (WZ) WITH OA NO. 23/2025 (WZ)**

**FACTUAL REPORT OF COMMITTEE**

Lalitkumar N. Chaudhari — Applicant

**Versus**

The Chief Secretary, Maharashtra & Ors. — Respondent

- **Directions passed by Hon'ble NGT vide order dated 06.03.2025:**

"Para 6….. with a direction that the Committee shall visit the site in question informing the applicant the date and time of inspection and submit **a report as to what are the violations alleged to have been committed** by the respondents within one month and **recommend the remedial measures.**"

- As per above order of Hon'ble NGT, Collector Jalgaon has issued order dated 02/04/2025 & formed committee regarding this issue. The order is annexed here with as **Annexure - I**
- On dated 13.05.025 Sub-Divisional Officer Jalgaon, Sub-regional Officer, Maharashtra Pollution Control Board, Jalgaon, Executive Engineer Tapi Irrigation Development Corporation, Jalgaon Visited the spot at Gat no 121 of Shingayat Shivar (Garkheda). But at this time representative of Forest Department & Tourism were absent. So the above committee members studied the concerned document, seen the spot. The re-visit with presence of applicant rescheduled on dated 20.05.2025. Letter was issued in this regard & receipt has been taken.
- **Visit of Committee with applicant** :- on dated 20.05.2025, all committee members with applicant were present & spot visit of site was done.
  The attendance sheet is attached herewith as **Annexure-II**
- Findings of committee as per directions of Hon'ble NGT of issues raised by applicant : -

**a)Ecologically sensitive Zone :-**

The site is not ecologically sensitive zone. No such Notification issued by central Government in this regard.

**b)Construction :-**

The site has 9 huts, 3 Villas, 3 swimming tanks, 12 cottages, 12 suites, 3 house boats. Some construction like open ampi-theatre, stage, corridor is ongoing & not completed as on date of inspection by committee.

As the construction built up area is 13000 sq meters (less than 20000 sq metres) so as per EIA Notification Environmental Clearance may not be applicable. In addition, Executive Engineer Waghur Dam Division has obtained Environmental Clearance on dated 27.10.2006 by Ministry of Environment, Forest & Climate Change New Delhi for dam site. the copy of the said is attached herewith as **Annexure - III**

**c) Issue related to illegal construction of approach road in forest area:-**

As per the para no 2 of order of National Green Tribunal (NGT) Western Zone bench Pune dated 6 March 2025 the complainant raised the issue regarding the illegal construction of the approach road through forest land compartment number 494. In this matter it is submitted that as per the provision of Schedule tribes and other traditional forest dwellers (Recognition of forest rights) act 2006 section 3(2) upon the resolution passed by the gram panchayat Garkheda Bk. Taluka Jamner, Dist. Jalgaon on 12/08/2022 mentioning the requirement of the road passing through the forest compartment number 494 for the use of farmers and cattle grazers.

On the basis of Gram Sabha resolution and proposal for the construction of road by PWD sub division Jamner on 09/12/2022, The Tahsildar Jamner had given a certificate vide letter 1263/2022 dated 12/12/2022 that there is no availability of alternate land for the construction of road. On receipt of the all documents & upon confirmation of the same, range forest officer Muktainagar had recommended for the construction of the road having length 1200 mtrs and width 3.75 mtrs vide letter no. A/land/3633/2022-23 dated 30.01.2023 as requested by the Gram Sabha.

Based on this office of the Deputy Conservator of Forests, Jalgaon Forest Division has issued permission for the construction of the said approach road vide letter no. land/3304/2022-23 dated 13.02.2023. A total of 0.45 ha. area was given for this purpose which falls under Comp. No. 494, Kurha West Beat, Kurha Panache Round, Muktainagar Range in Jamner Taluka. The land was permitted for construction of the approach road, only under the condition that it

must not be used for any other purpose other than what it was permitted to. Also no trees to be felled, no wildlife (including birds) to be harmed, no material from forest to be used for the road work. And special care to be taken to ensure that no violation of Indian Forest Act 1927, Wildlife Protection Act 1972, Forest Conservation Act 1980 and other related forest acts/laws in place. The copy of the said is attached herewith as **Annexure - IV**

**d) Issue related to Sewage & Noise Pollution:-**

M/s The Backwoods Emerald Resorts has provided three (03) numbers of Sewage Treatment Plant (STP) of 10 KLD each capacity for the treatment of sewage generated from hotel, restaurant and resort activities and same was found in operation during the visit.

During the visit no any noise pollution was observed. M/s The Backwoods Emerald Resorts shall ensure to take appropriate measures to control noise pollution, if any in future and shall obtain necessary permissions from concerned departments for using public speaking systems as a remedial measure.

M/s The Backwoods Emerald Resorts have obtained the Consent to Establish and 1st consent to operate from Maharashtra Pollution Control Board vide dated 19.08.2024 with condition that this consent shall not to be constructed as exemption from obtaining necessary NOC/Permission from any other government authorities. The said consent letter dated 19.08.2024 attached herewith as **Annexure - V**

**e) Other NOCs:-**

**Sailing of Boats :-**

The site has obtained no objection certificate of sailing of boats issued by Water Resources Department, Mantralaya Mumbai dated 16.09.2024. The copy attached herewith as **Annexure - VI**

**Permission for Development work for Tourism :-** The site has obtained permission for development work tourism by Tapi Irrigation Development Corporation, Jalgaon (Waghur Dam Division) dated 12.05.2020 issued for Executive Engineer, PWD, Jalgaon The copy attached herewith as **Annexure - VII**

The resort & site has obtained no objection certificate from **Central Ground Water Authority** (CGWA) issued by Government of India, Ministry of Jal shakti, Department water resources, New Delhi dated 31/12/2024 which valid

up to 30/12/2029 for the ground water extraction. The copy attached herewith as **Annexure - VIII**

Considering facts mentioned points (d) & (e) as on today no question of pollution observed.

**f)Inspection in presence of applicant :-**

All above mentioned site, NOCs, sewage treatment plant, approach road, boat sailing etc. has been inspected & discussed in presence of applicant & committee members dated 20.05.2025 as joint visit between 4:30 pm to 6:15 pm.

**g) Remedial Measures:-**

i) Care should be taken by The Executive Engineer, PWD ensuring that no law (Both Central and State Government) should be violated while executing the project.

ii) A report of action taken / compliance should be given by Executive Engineer, Public Works Department, Jalgaon on terms & conditions mentioned in obtained NOCs/Conditional permissions within 4 months to Hon'ble NGT, so that all terms & conditions shall be followed.

Hence the factual report with remedial measure respectfully submitted as above by committee to Hon'ble NGT.

**Deputy Director,**
**Tourism Development Corporation**
**Nashik**

**Executive Engineer**
**Tapi Irrigation Development**
**Corporation, Jalgaon**

**Sub Regional officer**
**Maharashtra Pollution Control Board**
**Jalgaon**

30/05/2025 (A. PRAVEEN)
**Deputy Conservator of Forests,**
**Jalgaon Forest Division**

**Representative & co-ordinator by**
**Collector Jalgaon (SDO Jalgaon)**

(९३)

342


# कार्यकारी अभियंता,
# सार्वजनिक बांधकाम विभाग जळगाव

जिल्हाधिकारी कार्यालयासमोर, जळगाव

फोन नं. (०२५७) २२२७३४३

e-mail: jalgaon.ee@mahapwd.gov.in


जा.क्र.साबांविज/लेखा/वलेली/३३९६ / सन २०२५.

दिनांक:-23 /०६ /२०२५

प्रति,
म. जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय,
जळगांव

**विषय :-** मुळ अर्ज क्रं. २३/२०२५ मधील अंतरिम अर्ज क्रं. ६५/२०२५ (प.वि.पुणे)"मौजे गारखेडा पर्यटन विकास प्रकल्प, वाघुर धरण बेट" संदर्भात गारखेडा पर्यटन विकास प्रकल्पात वाघूर जलाशय क्षेत्रातील रस्ता बांधकामासंदर्भात माहिती व स्पष्टता मागविणे बाबत.

**संदर्भ:-**
१. मुळ अर्ज क्रं. २३/२०२५ मधील अंतरिम अर्ज क्रं. ६५/२०२५(प.वि.पुणे)
२. आपले कार्यालयीन पत्र क्रमांक दंडप्र-०४/E Comp. No. १६३०७९३ File No. COLJG-२००१४ (२३)/३२/२०२५-Home दि. १८/०६/२०२५

उपरोक्त विषयास अनुसरुन मा. राष्ट्रीय हरित लवाद, पुणे यांचे समोर वाघूर धरण परिसरातील गारखेडा बेटावर सुरू असलेल्या पर्यटन प्रकल्पासंदर्भात अर्जदाराने केलेल्या आरोपानुसार आपणास सादर करण्यात येते की सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत धरणाच्या पाण्यातुन (जलाशय क्षेत्रात) कुठलाही रस्ता तयार करण्यात आलेला नाही.

हे आपल्या माहीतीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव सविनय सादर.

कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग,जळगांव

प्रत:- म.अधीक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम मंडळ,जळगावं यांना माहितीसाठी सादर.

(९५)

343

# महाराष्ट्र शासन
## जिल्हा परिषद जळगाव
ग्राम विकास (ग्रामपंचायत) विभाग

दुरध्वनी क्र.०२५७-२२२९११० Email ID - dyceovpjalgaon@gmail.com

जा.क्र/ग्रापंवि/लेखा-2 /गारखेडा/आरआर/ २५ /२०२५

ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद जळगाव
दिनांकः-२४.०६.२०२५

प्रती,

मा.जिल्हाधिकारी
जळगाव

**विषय:-** मुळ अर्ज कर. 23/2025 मधील अंतरीम अर्ज.क्र.65/2025 (प.वि.पुणे) मौजे गारखेडा पर्यटन विकास प्रकल्प, वाघुर धरण बेट संदर्भात घनकचरा व्यवस्थापानावर अहवाल सादर करणेबाबत.

**संदर्भ:-** १) आपले कडील पत्र क्र.दंडप्र-04/E Comp No1630793 File No. COLJG-20014 (23)/32/2025/HOME दिनांक:- 10.06.2025

महोदय,

संदर्भिय विषयान्वये सविनय सादर की, मौजे गारखेडा पर्यटन विकास प्रकल्प, वाघुर धरण बेट येथे भेट दिली असता, तेथे साधरणता 13 एकर परिसरावर, पर्यटन विकास प्रकल्प, वाघुर धरणावर पसरलेला आहे. सदर प्रकल्पात सध्या खालील प्रमाणे व्यवस्था आहे.

| अ.क्र. | तपशिल | संख्या | एकुण क्षमता |
|---|---|---|---|
| 01 | 12 कॉटेज | 2 | 24 |
| 02 | 12 सुट | 2 | 24 |
| 03 | 2 व्हीला | 3 | 12 |
| 04 | 2 वॉटर बोट | 6 | 12 |
| एकुण | | 13 | 72 |

वरील तपशिलाप्रमाणे एकुण 72 पर्यटकांची राहण्याची क्षमता उपलब्ध असुन, त्या ठिकाणी दोन शिफ्ट मध्ये काम करणारे एकुण 27 कर्मचारी आहेत. त्यात वॉचमन, शेफ, ऑपरेटर इ. कर्मचारी चा समावेश आहे.

तसेच घणकचरा व्यवस्थापणाची सध्याची व्यवस्था

STP प्लांट 3 युनिट आहे.

1) एक मोठे युनिट 10 KLD क्षमता

2) दोन छोटे युनिट 5 KLD क्षमता

एकुण क्षमता = 20 KLD आहेत.

सदर पर्यटन प्रकल्पावर, दोन कम्पोस्ट पीट आहे. त्याची क्षमता 4' X 4' X 5' = 80 घन.फुट आहे. त्यात साधारणतः ओला कचरा कंपोस्टींग साठी टाकला जातो. दररोज 110 ते 120 लिटर ओला कचरा निर्माण होतो. व साप्ताहीक सुटीच्या दिवशी कचर-यात वाढ होते.

Scanned with OKEN Scanner

यासाठी ग्रामपंचायती कडे बॅटरी चलीत तीन चाकी वाहन असून, त्या वाहनाची क्षमता, ओला कचरा 120 लीटर, सुका कचरा 240 लीटर, व घणकचरा 110 लिटर इतकी आहे.

तसेच ग्रामपंचायती कडे स्वतः चे नॅडेफ व कपोस्ट पीट आहेत. या गावाची लोकसंख्या 2010 इतकी आहे. वाघुर धर गावरच्या बेटा वरुन येणारा 'ओला व सुका कचरा वहनासाठी व सुरक्षित विल्हेवाट साठी ग्रामपंचायत मार्फत वाहनांचा उपयोग वेळोवेळी केला जात असल्याने. प्रत्यक्ष भेटी अंती वरील प्रमाणे निदर्शनास आले आहे. तरी सदरील अहवाल स्वीकृतीस सविनय सादर .


**सोबत:-** भेट दिल्याचे छायाचित्र जोडलेले आहेत.

(बी.एस.अकलाडे)
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं)
जिल्हा परिषद जळगाव


Scanned with OKEN Scanner

98

345




Scanned with OKEN Scanner




Scanned with OKEN Scanner




347

20


Scanned with OKEN Scanner




Scanned with OKEN Scanner

24

349




Scanned with OKEN Scanner